


साप्ताहिक
# डोंगरचा राजा
www.dongarcharaja.com
वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र
संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ९ ■ अंक ६ ■ बुधवार, दि.२ ऑगस्ट २०२३ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-143-2021-2023 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# सरण रचण्यासाठी जागा देता का जागा!

## बाहेगव्हाणला स्मशानभूमीच नाही; भूमिहीन व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अंत्यविधीचा प्रश्न

डोंगरचा राजा विशेष

इतकेच मला जाताना
सरणावर कळले होते...
मरणाने केली सुटका,
जगण्याने छळले होते...

असं सुरेश भट यांनी आपल्या एका कवितेत म्हटलंय... पण या कवितेच्या ओळीही खोट्या ठरवण्याचे काम बाहेगव्हाणमध्ये होतेय... या ठिकाणी मरणानंतरही सुटका होत नाही... अंत्यविधीसाठी नातेवाईकांची धावाधाव होते... जागाच नाही मिळाली तर मृतदेहाचीही विटंबना होण्याचा प्रसंग ओढावतो... स्मशानभूमीसाठी जागाच निश्चित नसल्याने हा प्रश्न असून गावचे, तालुक्याचे अन् प्रसंगी जिल्ह्याच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मातब्बरांचे गाव असतांनाही बाहेगव्हाणमध्ये ही परिस्थिती असल्याने याला नेमकं म्हणायचं काय? असा प्रश्न आता पडलाय... कारण तालुक्यातील विविध गावच्या समस्या सोडवण्यासाठी बाहेगव्हाणमधील मातब्बरांचा पुढाकार असतो, मग त्यांच्याच गावात साध्या स्मशानभूमीचा प्रश्न इतक्या दिवस रखडला कसा? असा प्रश्न सर्वसामान्यांना असून किमान आता तरी या प्रश्नावर सर्वजण एकत्र येवून तत्काळ निर्णय घेतील अशी अपेक्षा आहे! (पान ३ वर)

### बैठक घेऊन तोडगा काढू:सभापती दिनेश मस्के



बाहेगव्हाण येथील स्मशानभूमी उभारण्यासाठी जागेचा ठराव झालेला आहे. जागा मालकाचे काही रक्कम जमा केली असून आनखी काही रक्कम बाकी आहे.आम्ही संबंधितांसोबत एकत्रित बैठक घेऊन तोडगा काढू.आम्ही या कामी निधी मंजूर करण्यासाठी विद्यमान आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या कडे पाठपुरावा सुध्दा केला आहे. जिल्हा परिषदेचे तत्कालीन सभापती जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आपण स्मशानभूमी उभारण्याची जबाबदारी आम्ही घेतली असून लवकरच एक समन्वयाची बैठक घेऊन हा तोडगा काढणार असल्याचे मत सभापती दिनेश मस्के यांनी व्यक्त केले.

### अंत्यसंस्कारास जागा मिळत नाही हे दुर्दैव:बंडु मस्के



आजच्या काळात जिवंतपणी सुध्दा माणसाला मरण यातना भोगाव्या लागतात हे सर्वांना माहीत आहे. आमचं गाव बाहेगव्हाण आहे. या गावात स्मशानभूमी नसल्याने अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. अंत्यसंस्कार करण्यासाठी आलेल्या कालच्या घटनेने दाखवून दिले आहे की मयत माणसाला सरण रचण्यासाठी जागा मिळत नाही हे दुर्दैव असल्याचे मत बंडु दत्तात्रय मस्के यांनी व्यक्त केले.

### तातडीने उपाययोजना राबवु:विनायक मुळे



ज्यांना जमिन नाही अशा घटकांना अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा उपलब्ध नाही हे खरे आहे. मात्र जे भुमीहिन घटक आहेत त्यांच्या हितासाठी आगामी काळात ही सुविधा कशी तातडीने उभारली जाईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत शिवसेनेचे नेते विनायक मुळे यांनी व्यक्त केले..

### जो निर्णय घेतील त्यास पाठिंबा: नंदकिशोर मस्के



माझ्या काळातच स्मशानभूमी उभारण्यासाठी माझ्या शब्दाखातर गावातील एक शेतकरी जागा देण्यासाठी तयार झाले. त्यांना थोडासा निधी दिला. ग्रामपचायत मध्ये ठराव मंजूर केला गेला.परंतु ठरल्याप्रमाणे लोकवर्गणी दिली गेली नाही.त्यामुळे स्मशानभूमी उभारण्यास अडचणी आल्या.आम्ही आजही गावच्या हितासाठी जो निर्णय घेतील त्यास पाठिंबा देऊ. ज्या शेतकऱ्याला जागेबाबत निधी देण्याचे ठरले त्यास निधी द्यावा.किंवा काही पर्यायी व्यवस्था होत असेल तर करावी.आम्ही आमच्या काळात विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या फंडातून थेट नियोजित स्मशानभूमी पर्यंत सिमेंट रस्ता देखील केला असल्याचे मत बाहेगव्हाण चे माजी सरपंच नंदकिशोर विष्णुपंत मस्के यांनी व्यक्त केले.

### जागा उपलब्ध करून द्यावी:राजेभाऊ मस्के



बाहेगव्हाण गावात अल्पसंख्याक कुटुंबातील व्यक्तींना अशा वेळी मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते.दुसरीकडे आमच्या गावातील इतर नागरिक आप आपल्या शेतात अंत्यसंस्कार करतात ते देखील दोन दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या आपल्या शेतात जाऊन हा विधी करतात.गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न रेंगाळत पडला आहे.प्रशासनाने या कामी विशेष लक्ष वेधून बाहेगव्हाण येथे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी असे मत भाजप नेते राजेभाऊ मस्के यांनी व्यक्त केले.

### सहा महिन्यांत स्मशानभूमी उभारु:अमरसिंह मस्के



बाहेगव्हाण मध्ये स्मशानभूमी उभारण्यासाठी ग्रामपंचायतने आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केली असून तसा ठरावही संमत करण्यात आला आहे. येत्या सहा महिन्यात बाहेगव्हाण या गावासाठी स्मशान भूमी उभारली जाईल.असे मत युवा नेते अमरसिंह मस्के यांनी व्यक्त केले.

### लवकरच स्मशानभूमी उभारणार:उपसरपंच मस्के



खरोखरच स्मशानभूमीचा प्रश्न गंभीर बनला आहे. आम्ही मात्र या महत्त्वाच्या कामात हलगर्जीपणा करणार नाहीत.मागील काळात काय झालं काय नाही झालं हे शोधत आम्ही बसणार नाहीत. हा गावच्या इभ्रतीचा प्रश्न आहे.आम्ही सर्व जण एकत्र येऊन एक बैठक घेऊ.आणि लवकरच स्मशानभूमी उभारु असे मत गावचे उपसरपंच सिध्देश्वर मस्के यांनी व्यक्त केले

### अंत्यविधीसाठी स्वत:च करावी लागते तजवीज!

बाहेगव्हाणमध्ये सार्वजनिक स्मशानभूमी नसल्याने एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास त्यांचे अंत्यसंस्कार त्यांच्याच मालकीच्या शेतामध्ये केले जाते. ज्यांच्याकडे चार-दोन एकर जमीन आहे, त्यांना हे शक्य आहे. परंतु ज्यांच्याकडे जमीनच नाही, त्यांच्या नशिबी मात्र मृत्यूनंतरही फरपट येते. यामुळे जिवंतपणीच एकर-दोन एकर जमीन खरेदी करुन ठेवत अंत्यविधीची तजवीज करण्याची वेळ बाहेगव्हाणमधील भूमिहीनांवर आलेली आहे. ज्यांना हे शक्य नाही, त्यांच्या नशिबी मृत्यूनंतरही अडचणी कायम असल्याचेच दिसते. किमान आता लोकप्रतिनिधी, प्रशासनाने तरी यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

# रोटरी क्लब ऑफ वडवणीच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर राऊत तर सचिवपदी आबासाहेब आंधळेंची निवड



वडवणी:प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ वडवणीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा नुकताच रेणुका माता संस्थान, चिंचवण रोड वडवणी या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला.या सोहळ्यात २०२३/२४ चे अध्यक्ष म्हणून श्री. ज्ञानेश्वर राऊत यांनी तर सचिव म्हणून श्री.आबासाहेब आंधळे यांनी पदभार स्वीकारला आहे.या दोघांच्या निवडी बद्दल अनेकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन यथोचित सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

रोटरी क्लब ऑफ वडवणीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच रेणुका माता संस्थान, चिंचवण रोड वडवणी या ठिकाणी करण्यात आले होते. मागील अध्यक्ष श्री.श्रीराम लंगे आणि सचिव श्री.सुनील कुलकर्णी यांनी आपला पदभार श्री. ज्ञानेश्वर राऊत आणि श्री.आबासाहेब आंधळे यांचेकडे सोपवला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री.आदित्य जीवणे ( बीड) यांनी मार्गदर्शन केले तर उद्घाटक म्हणून श्री.सुधीर लातुरे,श्री.निशिकांत पाचेगावकर, प्रोजेक्ट चेअरमन श्री.भाऊसाहेब पूर्भे तर को.प्रोजेक्ट चेअरमन श्री. आण्णा महाराज दुटाळ हे होते. यावेळी रोटरी क्लब ने पालकत्व स्वीकारलेल्या कु.खोटे आणि कु.गार्डी या दोन मुलींना रुपये ५००० चा धनादेश देण्यात आला.प्रमुख पाहुण्यांनी रोटरी क्लब वडवणी ने मागील काळात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नविन रोटरी सदस्य म्हणून डॉ.श्री सतीश मुंडे ,श्री.किशोर अंडील,डॉ.श्री.सुरेश मुंडे,श्री.गोविंद आंधळे यांनी प्रवेश घेतला. यावेळी खास बीडहून आलेले बीड रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याणराव कुलकर्णी, प्रा.नितीन आघाव, श्री.वखरे,श्री.महाजन, श्री.कटारिया यांच्या सह वडवणी नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, जेष्ठ नेते विनोदकुमार नहार, संजय आंधळे,अमोल आंधळे,रणजित धस, वकील संघाचे सर्व पदाधिकारी,केमिस्ट अँड डर्गिस्ट संघटना, डॉक्टर असोसिएशन, सर्व शिक्षक बांधव याच सोबत रो डॉ बोंगाने रो डॉ मुंडे रो डॉ टकले रो माने रो पतंगे रो गोंडे रो शिंदे रो आंधळे रो आळणे रो लांडे रो तापडिया रो शेंडगे रो शेळके रो मस्के आदि उपस्थित होते.

# संभाजी भिडेंच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास लाखाचे बक्षीस:राजेसाहेब देशमुख

बीड : प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विरोधात जाणीवपूर्वक गरळ ओकणाच्या संभाजी भिडेच्या वक्तव्याचा बीड काँग्रेसच्या वतीने तिव्र निषेध व्यक्त करत घोषणाबाजी करण्यात आली. जो कोणी संभाजी भिडेला काळे फासेल त्याला बीड काँग्रेसच्या वतीने एक लाखाचे बक्षिस दिले जाईल अशी घोषणा आय काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेसच्या वतीने तिव्र दिनर्शन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्य देशमुख हे माध्यमांना बोलत होते.

बीड जिल्हा काँग्रेसच्या वतीने मंगळवार दि. १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कर्यालयासमोर तिव्र निदर्शने करत संभाजी भिडे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यांच्यावर कडक कारवाईची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, उपाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, नवनाथराव थोटे, केजचे माजी नगराध्यक्ष पशुपतिनाथ दांगट, जिल्हा सरचिटणीस प्रवीणकुमार शेप, जिल्हा सरचिटणीस भास्कर केदार, समीर देशपांडे, बीड तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, शिरूर तालुका अध्यक्ष रमेश सानप, परळी तालुकाध्यक्ष अनिल जाधव, केज तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे, वडवणी तालुकाध्यक्ष ज्ञानदेव आंधळे, बीड शहराध्यक्ष परवेझ कुरेशी, शिरूर शहराध्यक्ष असेफ शेख, युवक प्रदेश सरचिटणीस शंभुराजे देशमुख, युवा नेते अशोक देशमुख, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे, ओबीसी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संभाजी जाधव उपस्थित होते.

# माजलगावमध्ये महसूल दिन साजरा




माजलगाव : प्रतिनिधी

दिनांक १ ऑगस्ट रोजी महसूल दिनानिमित्त माजलगाव शहरांमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व महसूल खात्यातील वरिष्ठ अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये महसूल दिन साजरा झाला.

यामध्ये सामाजिक कार्यातील विशेष योगदानाबद्दल श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक अॅड रवींद्र कानडे यांचा सत्कार बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ मुंडे (आयएएस) यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.याप्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी आदित्य जीवने (आयएएस) ,निवासी जिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, उपजिल्हाधिकारी श्रीमती नीलम बाफना मॅडम व तहसीलदार श्रीमती मनाळे मॅडम व जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ‘पंधरा दिवसात ऊसतोड कामगारांची नोंदणी करा’

बीड :प्रतिनिधी

शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. २१ सप्टेंबर २०२१ अन्वये राज्यातील ऊसतोड कामागार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहे व जे सतत मागील तीन वर्षापासुन ऊसतोडणी करीत आहेत अशा ऊसतोड कामगारांची ग्रामसेवकाने (संबंधीत गावातील, वस्त्यांमधील, पाडयांमधील व इतर सर्वेक्षण करुन नोंदणी करावी असे निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने बीड जिल्हा जिल्हा परिषदेमार्फत ऑनलाईन वेबसाईट तयार केलेली असुन याव्दारे ३७६३४ ऊसतोड कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

दिनांक ०६ जुलै २०२३ रोजीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, बीड यांनी सर्व ऊसतोड कामगार यांनी १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत नोंदणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे लाभ घेण्यासाठी ऊसतोड कामगार नोंदणी असणे आवश्यक आहे. तरी सर्व ऊसतोड कामगार यांनी १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांनी केले आहे.



# राष्ट्रसंत भगवान बाबा सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी बालाजी चाटे तर कार्याध्यक्षपदी सुशील बडे

वडवणी:प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा कार्यकारिणीची निवड नुकतीच जाहीर करण्यात आली असून यामध्ये अध्यक्षपदी बालाजी चाटे, कार्याध्यक्षपदी सुशील बडे, सचिवपदी अँड. सचिन बडे, उपाध्यक्षपदी गोरख दराडे, बालासाहेब घुगे, नवनाथ तांबडे, सुशील मुंडे यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की, वडवणी शहरात या वर्षीचा राष्ट्रसंत भगवान बाबा सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यासाठी नुकतीच एक बैठक घेण्यात आली. याबैठकीत वडवणी तालुका कार्यकारिणी गठित करण्यात आली असून यामध्ये अध्यक्षपदी बालाजी चाटे, कार्याध्यक्षपदी सुशील बडे, सचिवपदी अँड. सचिन बडे, उपाध्यक्षपदी गोरख दराडे, बालासाहेब घुगे, नवनाथ तांबडे, सुशील मुंडे यांच्या निवडी जाहीर केल्या आहेत. हा सोहळा अत्यंत देखण्या स्वरूपात साजरा करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे. या नवनिर्विचित कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत अनेकांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

## संपादकीय

# मुक आक्रंदन ऐकायला हवे

जगातील महिला आणि मुलींची परिस्थिती इतकी वेगाने खालावत आहे की, स्त्री आणि पुरुष यांना समान वागणूक तसेच अधिकार मिळायला आणखी किमान तीनशे वर्षे तरी जावी लागतील, असे भाकीत संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अंतोनियो गुटेरस यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. असे बोलताना त्यांच्यासमोर भारत होता की नाही, हे माहीत नाही. मात्र, भारतातील सध्याचे भयकारी चित्र पाहता तीनशे वर्षांनी तरी मुलींना आणि महिलांना आपल्या मनाप्रमाणे शिकता, जगता, नोकरी करता आणि मुख्य म्हणजे गायब न होता जगता येणार आहे की नाही, हे कळायला मार्ग नाही.

भारतात काही संस्था 'व्हॅनिशिंग गर्ल्स' अशी मोहीम चालवतात. जन्म घेण्यापूर्वीच मुली कशा गायब केल्या जातात, याकडे लक्ष वेधणारी ही मोहीम आहे. मात्र, जन्म घेतलेल्या मुली रातोरात आणि हातोहात कशा गायब केल्या जातात आणि नंतर त्या कोणत्या नरकात जाऊन पडतात; हे पोलिसांसहित साऱ्या व्यवस्थेला माहीत असूनही सगळ्यांची अळीमिळी गूपचिळी आहे. याचे कारण, डोळ्यांनी जे दिसते ते पाहायचे नाही. या मुलींचे आक्रंदन ऐकायचे नाही. शहरोशहरी देहविक्रय करणाऱ्या लक्षावधी मुलींचे मूळ शोधायचेच नाही आणि त्यांचे नाव, गाव, कुटुंब सारे पुसून त्यांना केवळ उपभोगाचा देह म्हणून जगवत ठेवायचे आणि त्या मरण पावल्या की त्यांना फेकून द्यायचे; असे आपल्या संभावित आणि सुसंस्कृत समाजाने ठरवूनच ठेवले आहे.

भारतात सन २०१९, २०२० आणि २०२१ या तीन वर्षांमध्ये एकूण १३ लाख १३ हजार मुली आणि महिला बेपत्ता झाल्याचे 'राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग' सांगतो. याचा अर्थ खरा आकडा किती जास्त असेल, याची कल्पना करता येईल. हा इतकाच आकडा जरी खरा मानला तरी या लाखो मुली काय केवळ पुढे शिकायचे, प्रियकराशी लग्न करायचे किंवा घरात भांडण झाले म्हणून पळून जात असतील? आणि तशा त्या गेल्या तरी त्यांचा कुठेतरी पत्ता सापडायला नको का? त्या गायबच कशा काय होतात? सन २०२१ मध्ये ज्या एकूण महिला बेपत्ता झाल्या; त्यातल्या ९० हजारांहून अधिक १८ वर्षांखालील म्हणजे कायद्याने सज्ञान न झालेल्या मुली आहेत. १८ वर्षांखालील म्हणजे कोणत्या वयाच्या? यात अगदी आठ ते दहा वर्षांच्याही मुली अनेकदा असतात. देशातील राज्यनिहाय आकडेवारी पाहिली तर स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्राला खरेतर शरम वाटावी, अशी स्थिती आहे. देशात मध्य प्रदेश यात पहिल्या तर बंगाल दुसऱ्या क्रमांकावर आहे. तिसऱ्या क्रमांकावरच्या महाराष्ट्रात या तीन वर्षांत एक लाख ७८ हजार महिला बेपत्ता झाल्या. याशिवाय, १३ हजार अल्पवयीन मुली आजही सापडलेल्या नाहीत. आधार कार्डाचे आपण एवढे कौतुक करतो, कुठेही कोणी असले तरी हरवू कसे शकत नाही, याच्या बाता मारल्या जातात. मग शंभर टक्के आधार कार्डे वितरित झालेल्या देशात इतक्या मुलींचा ठावठिकाणा असा कायमचा कसा हरवून जातो?

महाराष्ट्रात विविध व्यासपीठांवर चालणारी सध्याची चर्चा इतकी दिशाहीन, विकृत, मतलबी, ढोंगी आणि द्वेषमूलक झाली आहे की या डिस्कोर्सला या लाखो बेपत्ता मुलींचे काय हो? भारतात निदान वीस लाख मुली, तरुणी सध्या देहविक्रयात असून देशभरात हा व्यवसाय चालणारी दोन लाखांहून अधिक ठिकाणे असावीत, असा अंदाज एका पाहणीत व्यक्त झाला होता. असे आकडे देणारी संस्था किंवा संघटना बाहेरच्या देशातील असली की लगेच अनेकांना 'भारतविरोधी कटा'चा वास येऊन त्यांचे राष्ट्रप्रेमी बाहू फुरफुरू लागतात. हा एकूण सगळा व्यवसाय भारतात आता ७० हजार कोटी रुपयांच्या घरात गेला असावा, असाही अंदाज आहे. बेपत्ता होणाऱ्या, पळवून नेल्या जाणाऱ्या मुलींचा पुढचा नरकापर्यंतचा प्रवास होण्यात किती आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत, हे या आकड्यावरून लक्षात येते. 'नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरो'ची स्थापना १९८६ मध्ये झाली. ही आकडेवारी देणाऱ्या एनसीआरबीची वेबसाइट उघडली की, पंतप्रधानांची प्रसन्न मुद्रा आणि 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' ही त्यांची आवडती उद्घोषणा दिसते. देशातील बेपत्ता होणाऱ्या या लक्षावधी मुलींना कोण साथ देते आहे? बाजारात नेणारे नातलग, दलाल, विक्रेते आणि त्यांच्या आयुष्याचा चोळामोळा करून टाकणाऱ्या गिधाडांपासून आम्ही वाचवू, असा विश्वास त्यांच्या मनात कोण निर्माण करत आहे? काही दिवसांपूर्वी मुली हरविण्याच्या तक्रारी वाढल्या तेव्हा रोज महाराष्ट्रात ६० ते ७० मुली कायमच्या हरवत आहेत, असे लक्षात आले. राष्ट्रीय आकडेवारीवरून ते आता सिद्धच झाले आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळ अधिवेशनात एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यात जो वेळ जातो; तेवढा तरी निदान या बेपत्ता मराठी मुलींचे मूक आक्रंदन ऐकण्यासाठी द्यावा. तेवढी तरी संवेदनशीलता उरली आहे का?

# शेतकरी वाचला पाहिजे





दत्ताराम दळवी
लालबाग,९८२०५२७८५५

प्रत्येक देशाची एक स्वतंत्र प्रसिध्दी असते. जसे आपला भारत देश हा शेती प्रधान देश आहे. भारताची आर्थीक उला - हाल ही शेती उत्पन्नावर अबलंबून असते असे म्हटले तर वावगे होणार नाही. प्रगत देसांच्या तुलनेत भारतानेही शेती उद्योगात बऱ्याच प्रमाणात प्रगती केलेली आहे. त्यात नवनवीन प्रयोग शेतकऱ्यांकरवी करवून घेतले जात आहेत. त्या नुसार देशात अनेक ठिकाणी नविन पध्दतीच्या शेतीचा अवलंब ही केलेला आहे.


परकिय शेतीच्या पध्दतीचा अवलंब ही भारतीय शेतकरी करीत आहेत. मात्र स्वदेशाला महत्व देऊन तशी शेती करणे भारतीय शेतकरी अवलंबीत आहे. वेगवेगळी बि-बियाणे उपलब्ध करुन ती भारतातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम शेतीवैज्ञानिक करीत आहेत. नविन पध्दतीचे अनुभव, फायदे तोटे समजावून सांगण्यात येत आहेत. परकिय देशातील इस्रायली व जापनीस पध्दतीच्या शेतीचा अवलंब भारतीय शेतकरी करीत आहेत.

भारताच्या प्रत्येक राज्यात तेथील परंपरे नुसार पारंपारिक पद्दतीने शेती केली जाते. जसे केरळ मध्ये भात, केळी आणि गरम मसाले, पंजाब मध्ये गव्हाला प्राधान्य दिले जाते, आसाम मध्ये चहा उत्पादनाला महत्व दिले जाते, अश्याच प्रकारे इतर राज्यातून ही शेती केली जाते. मात्र महाराष्ट्रातच सर्व प्रकारची शेती केली जाते. चहा उत्पादन सोडले तर सर्वप्रकारची शेती केली जाते. त्यासाठी कोकण आणि उर्वरीत महाराष्ट्र असे दोन विभाग पडतात. कोकणात भात, नाचणी, वरी, उडीद, कुळीथ, हरीक आणि आता ऊस शेती सुध्दा केली जाते. आधुनिक शेतीत तर सर्वच प्रकारची शेती करुन शेतकरी नव नवीन उपक्रम करीत आहेत. मात्र त्यांना सरकारचे सहकार्य हवे तसे मिळत नसल्याचे दिसत आहे. त्यांना जर शास्त्रशुध्द पध्दतीचे प्रशिक्षण दिले तर बरीच प्रगती होऊ शकते. महाराष्ट्र सरकारने नवीन बि-बियाणे व उपकरणे उपलब्ध केली असली तरी ती सर्वसामान्य शेतकऱ्याला परवडणारी नाहीत. त्यासाठी सर्व शेतकऱ्यांना सबसिडी मिळवून द्यायला हवी. किवा सरकारी खर्चाने उपकरणे उपलब्ध करुन देणे गरजेचे वाटते. परदेशात अशी पध्दत असावी असे वाटते. कारण त्यांनी प्रगत आणि प्रचलित शेती अवलंबली आहे.

भारतीय कृषी वैज्ञानिकानी केलेल्या नविन संशोधनाची पध्दतशीर कृती भारतीय शेतकऱ्यांना देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालणे उचित ठरेल. अनेक शेतकरी उपयुक्त हवामानानुसार शेती करतातच परंतु सफरचंद सारखी थंड हवेत होणारी शेती सुध्दा महाष्ट्रात करुन दाखवली आहे. म्हणजेच महाराष्ट्रात सर्वप्रकारची शेती होते मात्र गर्ज आहे ती योग्य मार्गदर्शनाची. महाराष्ट्रात कोकण सोडले तर उर्वरीत महाराष्ट्रात सर्वच शेतकरी सरकारी आणि सावकारी कर्ज घेऊन शेतीची कामे करतात. शेती विषयक उपकरणांसाठी व शेती साठी कर्ज घेऊन कर्जबाजारी झालेले शेतकरी बरेच आहेत. त्यात मुका, ओला दुष्काळ आणि अनेक प्रकारचे रोग कारणाभूत होतो. आणि शेतकरी कर्ज फेडु शकत नसल्यामुळे आत्महत्या करीत आहेत. ह्याला जबाबदार कोण ? असा प्रश्न निर्माण होतो.

सरकार विविध शेतीविषयक विधेयके मंजुर करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम करीत आहे. परंतु सरकारी मदत कुठेतरी कमी पडते आहे आणि ती कृतिशील शेतकऱ्यांना मिळावी अशी मागणी शेतकरी सरकारकडे करीत आहेत. नुकसान झालेल्या शेतीवरील कर्जमाफी मागत आहेत. त्यांचाही विचार सरकारने करायला हवा. कारण शेतकरी जगला तरच देशाची प्रगती होईल. असे मत भारतीय शेतकऱ्यांचे आहे. वरील समस्यांचा सारासार विचार करता शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहीजे. असेच सर्व शेतकऱ्यांना आणि समाजाला वाटते.





# ड्रॅगनवाले कुलकर्णी

शेती बांधावरून करायची नसते त्यासाठी रानात पायाला चिखलाचे मोठमोठे पेंड लागेपर्यंत कष्ट उपसावे लागतात. निसर्गाच्या लहरीपणाचे फटके खावे लागतात अन तरीही अहोरात्र मेहनत करावी लागते तेव्हा कुठे दोन सुखाचे घास गवसतात. मेहनत मेहनत आणि मेहनत याला पर्याय नसतो.दीर्घकाळ राब राब राबल्यावर कुठे शेतीला अन शेताला आकार देता येतो.

तब्बल दोन वर्षांनी परवा कल्याण कुलकर्णी यांच्या धूनकवडच्या शेतात गेलो होतो, एखाद्या फ्रुट स्टॉलवर जितकी फळं ठेवलेली असतात जवळजवळ तितक्या फळांची बाग कल्याणकाकांनी फुलवलीय. यंदा अर्धाच आंबा हाती आला पण काकांचं धीरोदात्तपण किंचितही कमी झालं नाही,डाळींब जोरदार होते,पुरेसं उत्पन्न देऊन गेले म्हणून डाळींबाच्या जागी आता मोसंबी लावलीय.आंबा तर एवढा केलाय की पुढच्या वर्षी आंबेच आंबे.आंबा, मोसंबी, सीताफळ, नारळ,अंजीर, अगदी सफरचंद देखील पण लक्ष वेधून घेत आहेत ते ड्रॅगन. या चिनी फळाने सध्या बाजारातही चांगलं स्थान मिळवलंय, औषधी गुण असणारी फळं ही अलीकडे ग्राहकांची गरज आहे. हे फळ म्हणजे निवडुंगाचं फुलच म्हणा की, कधी काळी असं फुल घोळून खाल्लेलं आहे मी, ड्रॅगनच्या काटेरी झाडांना सिमेंटचे पोल



आणि वर मोठं चाकासारख्या चक्राचा आधार द्यावा लागतो.तेव्हा कुठं हे झाड फळांचा भार पेलू शकतं.याचं फुल हेच फळ असतं,गुलाबी अन लाल रंगाचे मिश्रण असणारे हे फळ दिसायला, चवीला अन आरोग्यासाठी खूपच चांगले आहे. केळी

महेश वाघमारे

सारखं सोलून आतला गर खाता येतो, म्हातारी माणसं तर सहज खाऊ शकतात, याचा ज्यूस देखील छान होतो, थोडी साखर घालून मिक्सरमधून काढलं की गडद गुलाबी रंगाचा ज्यूस तयार होतो.सध्या बाजारात ड्रॅगन उपलब्ध आहे अन मागणीही आहे.

मी कल्याणकाकांचे नेहमी निरीक्षण करतो ,हा माणूस कोणत्या ना कोणत्या कामात असतो,बीडला विविध क्षेत्रात सक्रिय राहून, व्यायाम करून ,नौकरी करून धूनकवडला शेतावर जायचं,जातांना बरोबर न्यायच्या वेगवेगळ्या वस्तू घ्यायच्या,मित्र बरोबर घ्यायचे अन मळ्यात गेलं की प्रत्येक झाडाची पाहणी करायची,जे दिसेल त्याची दुरुस्ती करायची,जे जे आवश्यक असेल ते स्वतः करायचे,सहकाऱ्यांना सूचना करायच्या. हा शेतकरी आता कुठे स्थिरावला आहे, मेहनत एवढी केली आहे की त्याला पारावार नाही, अधून मधून नैसर्गिक संकटं येतात तेव्हा सोशल मीडियावर काका मनातून चीड व्यक्त करतात, खरंय त्यांचं,ज्याचं जळतं त्यालाच कळतं. काका दिलदार मनुष्य आहे माळ्यातले फळं मळ्यात खाण्याची मजा त्यांच्यासोबत नेहमीच घेता येते.जाता येता वडवणीला, तेलगावला काहीतरी खाऊ घालणार, जेवायचा आग्रह करणार अन बीडला आलं की गाडीच्या डिकीत भरून आणलेली फळं घरी घेऊन जा म्हणून भरभरून देणार. म्हणूनच एकेकाळी केशर आंबेवाले कुलकर्णी आता ड्रॅगनवाले कुलकर्णी म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत, उद्या अजून एखादं दुसरं फळ घेऊन हे कल्याणकाका येतील हे नक्की.

## मुंबई - गोवा महामार्गासाठी आता आरपारची लढाई

### कोकणातील पुढाऱ्यांना १०,००० एसएमएस पाठवून जाब विचारणार

मुंबई : प्रतिनिधी

गोवा महामार्गाची झालेली दूरवस्था आणि १३ वर्षांपासून रखडलेले महामार्गाचे काम याचा निषेध कोकणातील पत्रकार आणि जनता अनोख्या पद्धतीने करत आहेत ..

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, पालकमंत्री उदय सामंत रायगडचे खासदार सुनील तटकरे, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांना एकाच दिवशी म्हणजे ९ ऑगस्ट २३ रोजी तब्बल १०,००० एस.एम एस पाठवून महामार्गाला होत असलेल्या विलंबाचा जाब विचारतील..

आज नागोठणे येथे झालेल्या रायगड प्रेस क्लबच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.. कोकणातील पत्रकारांसह स्थानिक जनता आणि मुंबई गोवा महामार्गाची दुरवस्था पाहून ज्यांना ज्यांना संताप येतो अशा सर्वांनी या "एस.एम एस आंदोलनात सहभागी व्हावे" असे आवाहन रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज खांबे यांनी केले आहे..

याच दिवशी पत्रकार बोंबाबोंब आंदोलन करून आपला निषेध नोंदवतील.. या आंदोलनात एस.एम.देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आदि सहभागी होत आहेत..



## नोबेल हजारे यांची तैवानमधील आणखी एका विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी निवड

बीड:प्रतिनिधी



बीड येथील पत्रकार उत्तम हजारे यांचा मुलगा नोबेल उत्तम हजारे हा विदेशात शास्त्रज्ञ बनणार असून, तैवानमधील एनडीएचयु विद्यापिठानंतर तैवानमधील आणखी एका ताईचुंग येथील एनसीएचयु विद्यापिठात त्याची उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे .नोबेल हजारे यांच्या या यशाबद्दल बीड जिल्ह्यातून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाचा विद्यार्थी असलेला नोबेल हजारे यांचे प्राथमिक शिक्षण बीड येथील संस्कार विद्यालयात झाले असून, महाविद्यालयीन शिक्षण बलभीम महाविद्यालयात झालेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एमएस्सी पूर्ण केल्यानंतर, पीएचडीसाठी झालेल्या पुर्व परिक्षेत नोबेल हजारे हा मुंबई विद्यापीठ औरंगाबाद विद्यापीठ व नांदेड विद्यापीठासाठी पात्र झाला होता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रो. बी.एन. डोळे सर, एम. डी. सिरसाट सर ,प्रो. अनिता मुरुगकर मॅडम, मेंटार विजयकिरण नरवडे सर ,प्रो. भरत मडावी सर , प्रो. ताटे बी. टी.सर तसेच राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केल्यानंतर, नोबेल हजारे यांची तैवान देशातील नॅशनल डाँग युनीव्हरसिटी (एनडीएचयु) विद्यापिठात उच्च शिक्षणासाठी निवड झाली होती, त्यानंतर ताईचुंग येथील एनसीएचयु या नामांकित विद्यापिठात त्याची निवड झाली आहे. याबाबतचे पत्र त्यास नुकतेच प्राप्त झाले आहे.

### या महिन्यात जाणार तैवानला

नोबेल हजारे यांनी विद्यापिठातील प्रवेश निश्चित केला असून, या महिन्यात पंधरा ऑगस्टनंतर तो विदेशात जाणार आहे. एनसीएचयु विद्यापिठात उच्च शिक्षणासाठी निवड झालेला नोबेल हा एकमेव भारतीय विद्यार्थी आहे.

### सिरसमार्गचा नावलौकिक

सिरसमार्ग येथील भूमीपूत्र असलेले ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांच्या मुलाने शैक्षणीक क्षेत्रात नेत्रदीपक यश संपादन केले असून, सिरसमार्गचा नावलौकिक वाढवला आहे, सिरसमार्ग व परिसरातुन विदेशात शिक्षणासाठी जाणारा नोबेल हजारे हा पहिला विद्यार्थी आहे .

## माजी नगरसेवक संजय बजाज यांचे दुःखद निधन

माजलगाव :प्रतिनिधी

येथील माजी नगरसेवक संजय रामनिवासजी बजाज वय ५५ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दिनांक २९ जुलै २०२३ शनिवार रोजी रात्री साडेनऊ वाजता सुमारास दुःखद निधन झाले आहे त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक ३० जुलै २०२३ रविवार रोजी दुपारी १२.३० वाजता राजस्थानी वैकुंठभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

शहरातील प्रसिद्ध डॉ.आर.जी. बजाज यांचे ते पुतणे होते. माजी नगरसेवक, प्रतिष्ठित शेतकरी, उद्योजक संजय रामनिवासजी बजाज वय ५५ वर्ष हे अत्यंत शांत संयमी मनमिळावू स्वभावाचे होते.त्यांचे अचानक अल्पशा आजाराने मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना प्रकृतीने साथ न दिल्याने दि. २९ जुलै शनिवार रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या पार्थिवावर आज दि.३० जुलै २०२३ रविवार रोजी दुपारी १२.३० वाजता माजलगाव येथील राजस्थानी वैकुंठभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ,तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. बजाज कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात डोंगरचा राजा परिवार सहभागी आहे.



## वैष्णवी महाविद्यालयामध्ये अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

वडवणी: म.नेता

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापाठ सलग्नित व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालयामध्ये लोकशाहीर,साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.शामसुंदर गुळभिले होते. तर प्रमूख पाहूणे म्हणून महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्राध्यपक व राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.बालासाहेब राजमाने होते. अध्यक्षिय भाषणा मध्ये प्राचार्यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या समाज सुधारणेच्या कर्माचा उपस्थितांना परीचय करुन दिला. ते यावेळी म्हणाले,तुकाराम भाऊराव साठे हे अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. साठे हे दलित समाजामध्ये जन्मलेले होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. परंतू नंतर त्यांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून समाजसुधारणा केली. तर प्रमूख पाहूणे.डॉ. बालासाहेब राजमाने यांनी लोकमान्य टिळक यांच्या राजकिय कार्याचा परीचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा. होके कैलास यांनी केले. तर आभार.प्रा. दत्ता सरवदे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयामध्ये कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२ ऑगस्ट २०२३ । पान ३




Mo:9923300876
7020546764
महेंद्र एस.उजगरे
विमा प्रतिनिधी
दि न्यु इंडिया इन्शोरन्स कं.लि.
शाखा : परळी वै.
सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

# बाहेगव्हाणच्या स्मशानभूमीचा प्रश्न ऐरणीवर

पान १ वरुन

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण या गावात स्मशानभूमीचा प्रश्न ऐरणीवर आला असून स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही या गावाला अंत्यसंस्कार करण्यासाठी सार्वजनिक स्मशानभूमी उपलब्ध नाही. गावातील नागरिकांना एक ते दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या स्वत: च्या शेतात जाऊन अंत्यसंस्कार करावे लागतात. तर भूमिहीनांना मात्र मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. काही दिवसापूर्वीच बाहेगव्हाण येथील भुमिहीन असलेल्या गायकवाड कुटुंबातील एका युवकाचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले होते.त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी सार्वजनिक स्मशानभूमी नसल्याने व जमीन नसल्याने अंत्यसंस्कार कोठे करावे हा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. सरण रचण्यासाठी कोणी जागा देता का जागा.? अशी काळजाला भिडणारी आर्त हाक देण्याची वेळ आली होती. मात्र यावेळी गावातीलच बंडु मस्के यांनी माणुसकी जपणारी माणसे आजही असल्याचे दाखवून देत आपल्या शेतात हा अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली.



एकीकडे देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही ग्रामीण भागात स्मशानभूमी नसल्यामुळे विदारक चित्र निर्माण झाले आहे. या मुलभूत प्रश्नाचा शासन प्रशासनाने तोडगा काढून स्मशानभूमीचा कायमचा प्रश्न मिटवावा अशी नागरिकांना आशा वाटत आहे. बीड जिल्ह्यातल्या वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण या गावातील स्मशानभूमीचा प्रश्न आता ऐरणीवर आला असून स्वतंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही या गावाला अंत्यसंस्कार करण्यासाठी सार्वजनिक जागा उपलब्ध नसल्याने स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही बाहेगव्हाण ग्रामस्थांना झगडावे लागत आहे. हे संपूर्ण तालुक्यातील जनतेला माहीत आहे. खरं तर तशा घटना घडुच नयेत.मात्र तशी घटना घडल्यानंतर या गावातील नागरिकांना एक ते दीड किलोमीटर अंतरावरील आपल्या मालकीच्या शेतात जाऊन अंत्यसंस्कार करावे लागतात ही निश्चितच एक शोकांतिका आहे असे म्हणावे लागेल. या महत्त्वाच्या प्रश्नाकडे गावातील ग्रामपंचायत चे सरपंच व उपसरपंच तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावर विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते या प्रकरणी किती गंभीरपणे दखल घेतात हे देखील आता पहावे लागणार आहे. काही कार्यकर्त्यांनी डोंगरचा राजा शी बोलताना आपल्या प्रतिक्रिया देखील दिल्या आहेत.




वडवणी तालुका रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी आमचे स्नेही मित्र ज्ञानेश्वर राऊत यांची तर सचिवपदी आबासाहेब आंधळे यांची निवड झाल्याबद्दल वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने यथोचित सत्कार करुन शुभेच्छा देताना डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे,मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष विनायक जाधव, पत्रकार महेश सदरे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष ओमप्रकाश साबळे, पत्रकार अर्जुन मुंडे सह आदी



औ.प्र.संस्था वडवणी येथे साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी उपस्थित कर्मचारी. श्री. इंगोले सर. देशपांडे मॅडम. श्री.उछैया सर. श्री. मेस्को कर्मचारी. श्री.रामेश्वर पाटोळे. शेख. निसार. व आशोक आधले.




वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे कोषाध्यक्ष पत्रकार शांतीनाथ जैन यांनी टाटा टॅगो फोर व्हीलर गाडी खरेदी केली आहे.या गाडीची पुजा सर्वांचे हस्ते केली.यावेळी जेष्ठ नेते विनोदकुमार नहार,महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक श्री.मायकर सर, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे,माजी पंचायत समिती सदस्य अंकुशराव पेशवे, जेष्ठ नागरिक भगवानराव लांडे,तालुका अध्यक्ष पत्रकार विनायक जाधव,पत्रकार महेश सदरे,पत्रकार अर्जुन मुंडे,माजी सरपंच सुभाष साळवे, उपसरपंच फेरोज पठाण,कानडे,आसिफ भाई,पांडुरंग बारटक्के सह आदींची उपस्थिती होती.

# गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.उत्तरेश्वर हंगे सेवानिवृत्त

वडवणी:प्रतिनिधी

२१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे सहशिक्षक उत्तरेश्वर साहेबराव हंगे सर, हे आज जुलै ३१ जुलै रोजी नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले, गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे सचिव प्राचार्य सोमनाथरावजी बडे,बीड जिल्हा परिषदचे उपशिक्षणाधिकारी काकडे साहेब, संस्थेचे सहसचिव संजयबाप्पा बडे, चिंचवणचे उपसरपंच मुयुर बडे,ढेकणमोहाचे सरपंच शिवाजी गाडीवान, उपसरपंच परमेश्वर थापडे,

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनंजय गुंदेकर,माजी सरपंच भाऊसाहेब डावकर,मौज चे सरपंच संदिप डावकर, सरपंच ज्ञानेश्वर जोगदंड ,तेजाब चव्हाण,रवि गंगावणे, आबासाहेब सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य संतोष जाधव,सतिष देवकते, प्राचार्य डी.एस. मुंडे सर, उप मुख्याध्यापक एम. एन .वाघमारे सर, उपप्राचार्य सातपुते सर सह पालक व विद्यार्थ्यां ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे सहशिक्षक उत्तरेश्वर हंगे सर, हे ३१जुलै रोजी नियत



वयोमानुसार ते सेवानिवृत्त झाले, गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सन्मानपूर्वक त्यांचा हृदय सत्कार करत त्यांना जड अंतकरणाने निरोप देण्यात आला ,यावेळी संस्थेचे सचिव प्रा. सोमनाथराव बडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना हंगे सरांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला,तर उपशिक्षणाधिकारी काकडे साहेब यांनी आपले सविस्तर मनोगत व्यक्त केले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी बसची दूसरी फेरी मंजूर करण्याकरिता आंबेसावळीचे उपसरपंच धनंजय गुंदेकर,मौज चे माजी सरपंच भाऊसाहेब डावकर,सरपंच संदीप डावकर, मौजवाडी चे सरपंच तेजाब चव्हाण, जूजगव्हाण चे सरपंच रवी गंगावणे ,मानकुरवाडी चे सरपंच ज्ञानेश्वर जोगदंड, ढेकणमोहा चे सरपंच शिवाजी गाडीवान, उपसरपंच परमेश्वर थापडे, ग्रामपंचायत सदस्य सतीश देवकते,संतोष जाधव, सुरवसे.जेष्ठ नागरिक पंडित दादा थापडे.हरी खाडे, शेलार, यांनी पाठपुरावा करत शाळेला सहकार्य केल्याबद्दल त्यांचा गोरक्षनाथ विद्यालयाच्या वतीने हृदय सत्कार करण्यात आला.तसेच बसचे चालक, घोलप साहेब,वाहक कांबळे मॅडम यांचाही सत्कार करण्यात आला.या सूत्रसंचालन प्रा.ए.वाय. मुंडे सर यांनी केले.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध स्पर्धा

पिंपरखेड:प्रतिनिधी

मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.. सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, आणि बुद्धिमत्ता चाचणी स्पर्धा वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होत्या ..सदरील स्पर्धेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपले कौशल्य या ठिकाणी दाखवले आहे ..शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा गौरव व्हावा,, त्यांना वाचनाची आणि अभ्यासाची गोडी लागावी,, म्हणून प्रत्येक महापुरुषांच्या जयंतीनिमित्त,, छत्रपती शाहूराव शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे सचिव



माननीय प्रकाश तुळशीराम खळगे सर हे सतत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असतात.. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे,, शिक्षक उदय निवृत्ती खरात सर यांनी दोन दिवस शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांचा फार मोठा सहभाग नोंदवला.. असंख्य विद्यार्थ्यांनी सदरील स्पर्धेमध्ये भाग घेतला होता .. विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले ..आणि त्यांना वाचनालयाच्या वतीने शालेय साहित्य देऊन त्यांचा गौरव करण्यात आला ..सदरील कार्यक्रमानिमित्त गावातील ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर शिंदे,, महादजी शिंदे ,,ग्रामपंचायत सदस्य केसर भाभी हिरामण खळगे,, सविता जितेंद्र खळगे,, कोणता बाई जाधव,, प्यारी भाभी शेख,, मनाभाभी शेख ,,छायाबाई साळवे,, अम्री भाभी खळगे,, इंद्राबाई गव्हाणे ,,मंदाबाई जाधव,, यांनी विशेष उपस्थिती दाखवली ..ग्रंथालयीन कर्मचारी शीलाताई सुखदेव उजगरे यांनी आलेल्या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले .. सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.. उदय निवृत्ती खरात सर यांनी आभार प्रदर्शन केले.

# कै. लाला पाटील फड विद्यालयात अंजली जाधव हिचा गौरव

घाटसावळी :प्रतिनिधी

कै. लाला पाटील फड माध्यमिक विद्यालय घाटसावळी येथे साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच शाळेची विद्यार्थिनी कु. अंजली रंजीत जाधव हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत यश प्राप्त करत मंत्रालयातील क्लार्क पदावर नियुक्ती झाली आहे. यानिमित्त शाळेच्या वतीने सत्कार करून भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यध्यापिका मुंडे मॅडम तर प्रमुख पाहुणे श्री गाडे सर होते.सर्वप्रथम आण्णाभाऊ



साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या नंतर मंत्रालयातील क्लार्क पदावर नियुक्ति झालेली कु. अंजली जाधव हिचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बडे सरांनी केले. यानंतर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आधारित विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले.कु. अंजली जाधव हिने आपली यशोगाथा विद्यार्थ्यांन समोर मांडली आणि विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले व अभ्यास कसा करावा याचे योग्य नियोजन आणि कठोर मेहनत हा यशाचा मूलमंत्र दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री गाडे सरांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापिका मुंडे मॅडम यांनी असे प्रतिपादन केले की सर्व विद्यार्थ्यांनी पूढे जावे यशस्वी व्हावे शाळेचे गावाचे आपल्या कुटुंबाचे नाव उज्वल करावे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. उजगरे सर यांनी केले व आभार श्री. लांडे सर यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.




नागवंशी बुद्धविहार येथे भालेराव मित्र मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. उपस्थित वडवणी नगरीचे नगरसेवक बाबासाहेब वाघमारे डीपीआयचे तालुकाध्यक्ष विलास कारके ॲड गौतम दादा भालेराव मित्र मंडळ चे जिल्हा सचिव सचिन कसबे मानवी हक्क अभियान युवा तालुका अध्यक्ष बंडू मुजमुले सामाजिक कार्यकर्ते पवन उजगरे ,कैलास उजगरे ,हनुमंत उजगरे सह आदी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०१/०८/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. आबासाहेब आन्ना आंधळे यांनी नगर भुमापन क्र.४४६ मधील प्लॉट नं.२९ मधील प्लॉट/घर क्रमांक ९२८ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : ९ मीटरचा रस्ता, पश्चिम : प्लॉट नं.२८, दक्षिण : १८ मीटरचा रस्ता, उत्तर : प्लॉट नं.३०, आकार : पुर्व पश्चिम १३ मी व दक्षिणोत्तर पुर्व बाजुने १९.२५ मी. पश्चिएम बाजूने २१.१० मी एकूण २६२ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

## जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०१/०८/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. मिना उमेश पालकर यांनी नगर भुमापन क्र.९५८ मधील प्लॉट नं.२९ मधील प्लॉट/घर क्रमांक ९२८ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : रस्ता, पश्चिम : नदी, दक्षिण : नाला, उत्तर : कालिका माता मंदिर, आकार : पुर्व पश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २० फुट, एकूण ७४.३४ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

## जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०१/०८/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. नवनाथ आनंदराव सावंत यांनी मोहल्ला गट नं. मधील प्लॉट नं.३१६५ मधील प्लॉट/घर क्रमांक ---- त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : रस्ता, पश्चिम : राऊत, दक्षिण : गणेश बडे, उत्तर : राऊत, आकार : पुर्व पश्चिम११ मि. व दक्षिणोत्तर ९.५४ मी. एकूण क्षे.१००.५४ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

## जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.०१/०८/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. रंदावणी बापुराव मुंडे यांनी मोहल्ला गट न मधील प्लॉट नं. व मधील प्लॉट/घर क्रमांक ... त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

प्लॉट क्र. ८७ पुर्व : गट नं.५३०, पश्चिम : ०९ मीटर रस्ता, दक्षिण : प्लॉट नं.१४४, उत्तर : ०९ मीटर रस्ता.

प्लॉट क्र. १४४ पुर्व : गट नं.५३०, पश्चिम : ०९ मीटर रस्ता, दक्षिण : प्लॉट नं.१४५, उत्तर : प्लॉट नं.८७.

आकार :(१) प्लॉट नं.८७ पुर्व पश्चिम ९ मी व दक्षिणोत्तर पुर्व बाजु ०७ मिटर, दक्षिण बाजु ०९, मी. एकूण ६३ चौ.मी.

आकार :(१) प्लॉट नं.१४४ पुर्व पश्चिम ९ मी व दक्षिणोत्तर पुर्व बाजु ०७ मिटर, दक्षिण बाजु ०९, मी. एकूण ६३ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२ ऑगस्ट २०२३ । पान ४


## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन



बीड : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेस शिवशंकर मुंडे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी, राजदीप बनसोड, सुनील आखाडे ,गिरीश कुलकर्णी, महादेव भाकरे, सतीश ठाकरे, रवींद्र शहाणे, विवेक उबाळे आदि कर्मचारी उपस्थित होते.

# वडवणी एसबीआय बँकेचा उच्चांक; साडेबारा कोटींचे वाटले पीककर्ज

**बचतगटांना १ कोटी ५१ लाखांचे दिलं कर्ज** | **तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळाला आधार** | **व्यवस्थापक पाटील यांचे मार्गदर्शन** | **सहाय्यक व्यवस्थापक थोरात यांचे नियोजन**

वडवणी:प्रतिनिधी

खरीप हंगामासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेने आतापर्यंत वडवणी तालुक्यातील १२ कोटी ७४ लाख रुपयांचे पीककर्ज शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले असून यामध्ये हजारो शेतकऱ्यांनी पीककर्जाचा लाभ घेतला आहे. खरीप आणि रब्बी हंगामातील पीक लागवडीसाठी दरवर्षी स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेकडून शेतकऱ्यांना बाजरी, मका, सोयाबीन, कापूस, तूर, मूग, भुईमूग, तीळ या खरीप पिकांबरोबरच ऊस आदी पिकांसाठी अर्थ पुरवठा केला जात आहे.

वडवणी शहरात एसबीआय बँक एकमेव एकच शाखा आहे. या शाखेचे सुत्र व्यवस्थापक म्हणून युवराज पाटील व साहाय्यक व्यवस्थापक धनराज थोरात यांनी सुत्र हाती घेताच शेतकरी प्रती असलेली प्रेम आणि सन्मानाची वागणूक दिली आहे. शेतकऱ्यांची पेरणीसाठी परवड होऊ नये म्हणून वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना




मे महिन्यापासून कर्ज वाटुन वडवणी शाखेचे उदिष्ट पुर्ण करत वडवणी तालुक्यात एक आदर्श निर्माण केला आहे. तसेच व्यावसायिकांना व बचतगटांना देखील कर्ज वाटप करण्यात आले आहे

त्यांच्या या कार्याबद्दल शेतकऱ्यांमधून व्यवस्थापक युवराज पाटील व साहाय्यक व्यवस्थापक धनराज थोरात यांचे कौतुक केले जात आहे. एसबीआय शेतकऱ्यांची अग्रणीय बँक म्हणून ओळखली जात असून शेतकर्यांना शेती कर्जासोबत शेती विषयक कामासाठी कर्ज देण्याचे काम बँकेच्यावतीने सुरू आहे. यासह वडवणी तालुक्यातील व्यावसायिकांना देखील मोठा आधार दिला आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी एसबीआय बँकेच्या पीककर्ज वाटपचे उद्दिष्ट यापैकी आतापर्यंत १२ कोटी ७४ लाख रुपयांचे पीककर्ज वाटप झाले असल्याचे बँक प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले. वडवणी तालुक्यातील ग्रामीण बँकांनी व एसबीआय बँकेने शेतकर्यांना खरीप हंगामासाठी कर्ज वाटप केलेले आहे. वडवणी तालुक्यात सध्या दमदार पावसाची प्रतिक्षा असून आतापर्यंत ८५ टक्क्यांपर्यंत खरीप हंगामातील पिकांची पेरणी झालेली आहे. लवकर दमदार पाऊस न झाल्यास वडवणी तालुक्यातील खरीप हंगामातील पिकांची स्थिती बिकट होण्याची शक्यता असून या अशा परिस्थितीत बँककेडून घेतलेल्या कर्जाच्या फेडीचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

गेल्यावर्षी खरीप हंगामासाठी वडवणी एसबीआय बँकेने गेल्यावर्षी ३००० शेतकऱ्यांना कर्ज वाटप केले होते यावर्षी खरीप हंगामासाठी आतापर्यंत १२ कोटी ७४ लाखांचे पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. एकंदरीत १०० टक्के कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. मे महिन्यापुर्वीच शेतकऱ्यांना कर्ज वाटप करुन शेतकऱ्यांना आधार देण्याचे कामगिरी शाखा व्यवस्थापक युवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक व्यवस्थापक धनराज थोरात, तुरुमय करमाकर यांनी केली आहे

**बचतगटांना १ कोटी ५१ लाखांचे कर्ज वाटप**

महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून लघुउद्योग सुरू करण्यासाठी व महिला सक्षमीकरणासाठी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी एसबीआय बँकेने कर्ज योजना सुरू केली आहे. वडवणी तालुक्यातील बचतगटांना एकाच वेळी १ कोटी ५१ लाखांचे कर्ज वाटप करुन एसबीआय बँकेने महिलांना प्रोत्साहन दिले आहे. तसेच विविध महामंडळाचे फाईलचे काम प्रगतीपथावर असून लवकरच सर्व फाईल निकाली काढण्यात येणार असून पुढील महिन्यात सर्व महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना कर्ज वाटप करण्यात येणार असल्याचे एसबीआय बँक प्रशासनाने सांगितले आहे.

**सा. व्यवस्थापक धनराज थोरात यांचे योग्य नियोजन**

वडवणी एसबीआय बँकेमध्ये गेल्या दोन वर्षापासून सहाय्यक व्यवस्थापक पदावर नियुक्त झालेले धनराज थोरात यांनी शाखा व्यवस्थापक युवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांची परिस्थिती पहाता आपण देखील शेतकऱ्यांचा मुलगा आहे म्हणून शेतकऱ्यांची पिळवणूक नाही झाली पाहिजे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी वेळेवर पैसे मिळावेत या हेतूने साहाय्यक व्यवस्थापक धनराज थोरात यांनी पीककर्ज वाटपाचे योग्य नियोजन करून वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना मे महिन्यापूर्वीच पीककर्ज वाटप करत शेतकऱ्यांना मोठा आधार दिला आहे. या कामगिरीमुळे धनराज थोरात यांचे शेतकरी बांधवांतुन कौतुक केले जात आहे.



# मनसेचा बीडमध्ये रास्तारोको

## मनसेचे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

बीड:प्रतीनिधी

मा हिंदुजननायक राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने, मनसे नेते दिलीप बापु धोत्रे, सरचिटनिस संतोष भाऊ नागरगोजे यांच्या सुचनेवरून मनसे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरासह जिल्ह्यात विविध मागण्यासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मनसेचे वतीने काल बीड जिल्हातील अवैध धंदे तात्काळ बंद करा, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २०२२ चे अतिव्रष्टीचे अनुदान तात्काळ द्या, शहरातील बीड जालना रोडवर मध्येभागी दुभाजक तात्काळ करा, शहरातील खड्डे तात्काळ भरा, सर्व सिग्नल तात्काळ चालू कारा, बीड शहरातील मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करा, बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरू असणारे अवैध धंदे बंद करा , गुटखा माफिया, वाळू माफिया, सावकारी, पत्त्यांचे क्लब दारूचे अवैध धंदे यासह विविध मागण्या संदर्भात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले , बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे हातावर पोट भरणाऱ्यांची संख्या बीडमध्ये मोठ्या प्रमाणात आहे.

औद्योगिक वसाहत नसल्याने बेरोजगार युवकांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे, या बेरोजगार युवकांचा बीड मधील काही माफिया अवैध कामासाठी वापर करताना दिसत आहे, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे बोकाळले आहेत मटका ,गुटका, दारूचे धंदे या पत्त्याचे क्लब सर्रासपणे सुरू आहे.

याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष असून गुन्हेगारांचे मनोबल उंचावले आहेत, विशेष म्हणजे बीड शहरातून जाणारे मुख्य रस्त्यावर दुभाजक गायब आहेत, शहरातील मुख्य चौकातील सिग्नल बंद असल्याने वाहतूक कोंडीची समस्या ही नेहमीचीच आहे, जिल्ह्यातील विविध समस्यावर तोडगा काढण्यास प्रशासन अपयशी येत असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी काल दिनांक २९ जुलै २०२३ रोजी भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, जिल्हाध्यक्ष सुमंत धस,महिला आघाडी राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे, उपजिल्हाध्यक्ष सदाशिव बीडवे, तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण गायके, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे, शहराध्यक्ष करण लोंढे, उपशहरध्यक्ष आकाश टाकळकर, उपजिल्हाध्यक्षा महिला कल्पना कवठेकर, आघाडी शहराध्यक्ष आशा घुले यासह मनसे पदाधिकारी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडवणीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात



वडवणी :प्रतिनिधी

बहुजनांच्या वेदनांना साहित्यातून वाचा फोडणारे आणि कष्टकऱ्यांच्या हक्कांसाठी झगडणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात मंगळवार दिनांक १ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता उत्साहात साजरी करण्यात आली आहे. यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व साहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसट यांच्या हस्ते लाल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले आहे. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करत प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली आहे. दि.२७ ऑगस्ट रोजी वडवणी शहरातुन भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

यावेळी साहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसट, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, माजी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती दिनेश मस्के, माजी सरपंच गंपू पवार, नगरसेवक भिमराव उजगरे, संजय आंधळे,रिपाइं तालुकाध्यक्ष महादेव उजगरे, भाई महादेव उजगरे, अमोल आंधळे, युवराज शिंदे, सतिष बडे, ॲड.आनंद काळे, गटनेते अस्लम कुरेशी, संजय उजगरे, विठ्ठल भुजबळ, मुन्ना मुंडे, हरी पवार, म विष्णू मुजमुले, ॲड. भास्कर उजगरे, दिलिप अवचर, विष्णू पाटोळे, दिलीप मुंडे, बाबुराव झोडगे, संजय कसबे, ॲड. सचिन अवचर, डिपीआय तालुकाध्यक्ष विलास कारके, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे, बाबासाहेब साळवे, अविनाश तुरुकझाडे, सचिन कसबे, बंडू मुजमुले, सह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिक्षणमंत्री श्री. दिपक केसरकर हे औरंगाबाद येथे संस्था चालक व शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीस उपस्थित होते.या बैठकीत शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांचा संस्था चालक प्रा.सोमनाथराव बडे व भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री.चंद्रकांत मुळे यांनी यथोचित सत्कार करुन महत्वपूर्ण विषयांवर चर्चा करून निवेदन दिले.

माजलगाव येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात महसूल दिन साजरा करण्यात आला. त्याच बरोबर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी केली. यावेळी सह दुय्यम निबंधक बी.डी. दारेवार,शेख आर.एम., मुंडे के .एस. व पक्षकार मोठ्या प्रमाणात हजर होते.



# बीडमध्ये तरुणाचा दगडने ठेचून खून

बीड : प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या चराटा रोडवरील रेल्वे क्रॉसिंग पुलाजवळ सोमवारी रात्री एका तरुणाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली.

पांडुरंग माने (राहणार आनंदवाडी तालुका जिल्हा बीड) असे या तरुणाचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास पाटील यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. पंचनामा केल्यानंतर मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.



वडवणी तहसील कार्यालयात दफेदार म्हणुन सेवा देणारे रंजित विश्वनाथराव काळे यांची उत्कृष्ट दफेदार म्हणुन निवड झाली. त्यांचा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते महसूल दिनानिमित्त प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.


**आळणे हॉस्पिटल**
ॲक्सिडेंट ऑर्थोपेडीक, ट्रामा केअर ॲन्ड डायग्नोस्टिक सेंटर
डॉ.एस.एल.आळणे
एम.बी.बी.एस. (अस्थिरोग तज्ञ)
मो.९४२०४१६३४३
डॉ.स्नेहा एस.आळणे
एम.बी.बी.एस. (कन्सल्टंट रेडिओलॉजीस्ट)
पत्ता : साठे चौकाजवळ, जालना रोड, बीड.
फोन ०२४४२-२२९९४९















हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड – ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)